N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** बारामती

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0250 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/06/2025 08:31

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 23/06/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/06/2025

**Time From (वेळेपासून):** 17:59 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/06/2025 **Time (वेळ):** 08:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 010

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/06/2025 08:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हटेल सिटी इन बारामती,ता बारामती, जि पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. रामचंद्र विठ्ठल बंडगर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तांदुळवाडी, ताबारामती, जिपुण,बारामती,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तांदुळवाडी, ताबारामती, ,बारामती,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9130480003

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.अवधुत धिमाजी जाधवर | | | 1. भगवंत बिल्डींग, त्रिमुर्ती बाग, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, ,च्या पाठीमागे, मांजरी, पुणे,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
मी श्री. रामचंद्र विठ्ठल बंडगर, वय 33 वर्षे, व्यवसाय- व्यवसाय, रा.तांदुळवाडी, ता.बारामती, जि.पुणे मो.क्र. 9130480003.

समक्ष हजर राहुन जबाब देतो की, "मी रामचंद्र विठ्ठल बंडगर, वय 33 वर्षे, व्यवसाय - अध्यक्ष रेणुका पॅरामेडीकल इंन्स्टीटयुट बारामती, रा. तांदुळवाडी, ता.बारामती, जि. पुणे असा असुन मी रेणुका पॅरामेडीकल इन्स्टीटयुट बारामती या संस्थेमध्ये अध्यक्ष म्हणुन कामकाज करत आहे. सदर संस्थेमध्ये वैदयकीय क्षेत्रास सहाय्यक शासनमान्य कोर्सेस नियमीतपणे घेतले जातात. सदर संस्थेचा महाराष्ट्र शासन कोड MSB120764असा आहे. आमच्या संस्थेतील 45 विदयार्थी संख्या सन 2024-25 च्या बॅचमध्ये आहे. सदर बॅचची वार्षिक प्रमाणपत्र परीक्षा 2025 दि.20/06/2025 ते 24/06/2025 दरम्यान घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी पर्यवेक्षक व परीक्षा केंद्र प्रमुख हा शासकीय औदयोगीक प्रशिक्षण संस्था माळेगाव बु., बारामती यांचेकडुन पत्र देवुन नेमला जातो व परीक्षा त्यांच्या अंतर्गत घेतली जाते. सदर परीक्षेमध्ये पर्यवेक्षक नेमण्याकरीता तसेच परीक्षा सुरळीत पार पाडण्याकरीता, परीक्षेमध्ये काहीएक अडचण न आणण्याकरीता श्री. ए. डी. जाधवर प्राचार्य, शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, माळेगाव बु., बारामती यांनी मला हॉटेल अमृता, बारामती येथे दि.17/06/2025 रोजी प्रति विदयार्थी 2000/- रुपये प्रमाणे 45 विदयार्थ्यांचे 90,000/- रुपयेची मागणी केली व मागणी पुर्ण न केल्यास परीक्षेला पर्यवेक्षक देणार नाही तसेच तुमच्या इन्स्टीटयुटमध्ये परीक्षा कालावधीमध्ये विदयार्थी गैरवर्तन करतात असा अहवाल शासनास पाठवुन देईल जेणेकरुन तुमच्या संस्थेची शासनमान्यता रद्द होईल असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना माझ्याकडे आता एवढी रक्कम नाही असे सांगुन तेथुन निघुन आलो. त्यानंतर दिनांक 19/06/2025 रोजी लोकसेवक जाधवर यांनी मला फोन करुन हॉटेल अमृता, बारामती येथे भेटण्यास बोलविले असता,आमची हॉटेल अमृता येथे भेट झाली. त्यावेळीमी त्यांना पर्यवेक्षक नेमण्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला 90,000/- रुपयांबाबत विचारणा करुन पैसे दिल्यानंतर पर्यवेक्षक नेमतो असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजास्तव 10,000/- रुपये दिले त्यानंतर त्यांनी मला शासकीय औदयोगीक प्रशिक्षण संस्था माळेगाव बु., बारामती येथील रुपनवर मॅडमला पर्यवेक्षक व परीक्षा केंद्र अध्यक्ष मिळणेबाबत पत्र देणेस सांगितले. त्याप्रमाणे मी शासकीय औदयोगीक प्रशिक्षण संस्था माळेगाव बु., बारामती येथील रुपनवर मॅडमला पत्र दिले असता, त्यांनी श्रीमती भाग्यश्री बाळासो नरवडे यांची प्रात्यक्षिक परीक्षेकरीता बहिस्थ परीक्षक म्हणुन नेमणुक केल्याचे महाराष्ट्र शासन औदयोगिक प्रशिक्षण संस्था, माळेगाव बु., ता. बारामती, जि.पुणे यांचे जाक्र.औप्रसंमा/प्रशि/प्रमाणपत्र परीक्षा/2025/831 दि.19/06/2025 अन्वयेचे श्री. जाधवर प्र. प्राचार्य, शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, माळेगांव बु., ता. बारामती जि.पुणे यांचे सहीचे पत्र दिले.दिनांक 20/06/2025 रोजी प्राचार्य जाधवर रेणुका पॅरामेडीकल इन्स्टीटयुट बारामती येथे आले व मला बाजुला घेवुन उर्वरीत 80,000/- रुपये बाबत विचारणा केली त्यावेळी मी त्यांना अजुन मुलांनी फी जमा केलेली नाही, माझ्याकडे एवढे पैसे नाहीत असे सांगितले. आज रोजी सकाळी 8:10 वाजण्याच्या सुमारास श्री. जाधवर प्राचार्य यांनी त्यांचे मोबाईल क्र.8830298368 वरुन माझे मोबाईल क्रमांक 9130480003 यावर कॉल करुन परीक्षा संपण्याआधी उर्वरीत 80,000/- रुपये देण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना बाहेरगावी आलो असल्याचे सांगितले. श्री.जाधवर, प्राचार्य औदयोगिक प्रशिक्षण संस्था, माळेगाव बु.हे मला मागणी करीत असलेली रक्कम ही कोणतीही शासकीय फी नसुन ती लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली असुन, ती मला देण्याची मुळीच इच्छा नाही.श्री.जाधवर यांचेविरुद्ध कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.श्री. जाधवर आणि माझ्यामध्ये कोणताही आर्थिक व्यवहार तसेच उसणवारी नाही."अशी तक्रार मी दि. 23/06/2025 रोजी लाप्रवि पुणे येथे श्री. गावडे पोलीस उपअधीक्षक यांचेकडे दिली होती.

माझ्या तक्रारी नुसार श्री. गावडे, पोलीस उप अधीक्षक यांनी एका अधिका-यास आपले दालनात बोलवुन मला त्यांचे नाव पोलीस निरीक्षक अमोल भोसले, लाप्रवि पुणे असे सांगुन त्यांना वरीलप्रमाणे हकिकत सांगुन, शासकीय

पंचांना पाचारण करुन पुढील कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर 16:30 वा. सुमारास वस्तु व सेवा कर विभाग, येरवडा पुणेयेथीलदोन शासकीय पंच पोनि भोसले यांचे कक्षात हजर झाले. पोनि भोसले यांनी माझी लेखी तक्रार पंचांना दाखविली ती पंचांनी वाचली. मी सांगितलेली हकिकत माझ्या लेखी तक्रारीप्रमाणे बरोबर असल्याची खात्री करुन पंचांनी माझे लेखी तक्रारीवर त्यांचे नाव व तारखेसह सहया केल्या. त्यानंतर पोनि भोसले यांनी मला पुढील पडताळणी कारवाई बाबत विचारणा करता, मी "लोकसेवक श्री. जाधवर हे आज मला फोन करण्याची शक्यता आहे तरी आपण काही थोडा वेळ लाप्रवि कार्यालयात त्यांचे फोनची वाट पाहुया" असे सांगितले. त्यामुळे लोकसेवक श्री जाधवर यांचे फोनची वाट पाहण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर 17:59 वा. सुमारास लोकसेवक श्री. जाधवर यांचा त्यांचे मोबाईल क्र.8830298368 वरुन माझे मोबाईल क्रमांक 9130480003 यावर फोन आला असता आमचे बोलणे अर्धवट झालेने मी लोकसेवक श्री. जाधवर यांना फोन लावुन, सदरचा कॉल हा व्हाईस रेकॉर्डरवर घेण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.त्याप्रमाणे लागलीच 18:00 वा. सुमारास माझे मो.क्र. 9130480003 यावरुन लोकसेवक श्री.जाधवर यांचे मोबाईल क्र. 8830298368 यावर कॉल करुन फोनचा स्पीकर ऑन केला असता, माझेत व लोकसेवक जाधवर यांचेत दोन्ही पंचासमक्ष बोलणे झाले त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद करणेत आला.

सदर फोनवरील संभाषणादरम्यान, मी लोकसेवक श्री. जाधवर यांना "उदया पेपरय ना म्हणुन म्हटलं भेटावं" असे बोललो असता त्यावर लोकसेवक श्री. जाधवर, मला"आपलं ठरल्याप्रमाणे करा, त्याला काय एवढं" असे बोलले, त्यावर मी, लोकसेवक श्री. जाधवर यांना "हा पर ते सर किती एक्झॅट किती दयायचं ते तुम्ही बोला" असे बोललो. त्यावर लोकसेवक श्री. जाधवर मला"नाय तुम्हाला सांगितलयं की, आपलं आपलं ठरलयं की, काय, आणखीन काय त्याच्यात हाय का अडचण" असे बोलले. त्यावर मी, लोकसेवक श्री. जाधवर यांना "एॆंशी हजार?"असे बोललो.त्यावर लोकसेवक श्री.जाधवर मला"हो चालेल चालेल" असे बोलले.

एकंदरीत वरील माझ्या व लोकसेवक श्री. जाधवर, प्राचार्य शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, माळेगावं बु. यांचेतील फोनवर झालेल्या संभाषणानुसार लोकसेवक श्री. जाधवर, प्राचार्य शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, माळेगाव बु., बारामती यांनी माझे रेणुका पॅरामेडीकल इन्स्टीटयुट येथे वार्षिक प्रमाणपत्र परीक्षा जुन 2025 करीता पर्यवेक्षक नेमण्याकरता तसेच परीक्षा सुरळीत पार पाडण्याकरीता, परीक्षेमध्ये काहीएक अडचण न आणण्याकरीता 80,000/- रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मला पोनि भोसले यांनी पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता,"मी लोकसेवक श्री.जाधवर यांचा मला फोन आल्यास मी त्यांचेशी पुन्हा लाचरक्कमेबाबत बोलतो कारण माझ्याकडे 80,000/- रुपये इतकी रक्कम उपलब्ध नाही तसेच त्यांना कधी व कुठे भेटायचे याबाबत बोलणे करतो" असे सांगितले. त्याअनुशंगाने पोनि भोसले मला सुचना देत असताना 18:59 वा. सुमारास लोकसेवक श्री. जाधवर यांचा त्यांचे मोबाईल क्र. 8830298368यावरुन माझे मोबाईल क्रमांक 9130480003 यावर फोन आला असता, मी फोनचा स्पीकर ऑन केला आणि माझे व लोकसेवक श्री. जाधवर यांचेत पंचासमक्ष बोलणे झाले.सदरचा फोन कॉल व्हाईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे.

सदर फोनवरील संभाषणादरम्यान, लोकसेवक श्री. जाधवर, मला "बरं बरं मग मला किती वाजता यावं लागेल?"असे बोलले त्यावर मी लोकसेवक श्री.जाधवर यांना "किती वाजता येता तुम्ही" असे बोललो.त्यावर लोकसेवक श्री. जाधवर मला"नऊ वाजेपर्यंत"असे बोलले. त्यावर मीलोकसेवक श्री. जाधवर यांना "नऊ वाजेपर्यंत.... चालतयना" असे बोललो.त्यावर लोकसेवक श्री.जाधवर मला "चालतय चालतय" असे बोललेॆ. त्यानंतर लागलीच पुन्हा 19:01 वा. सुमारास लोकसेवक श्री. जाधवर यांचा त्यांचे मो.क्र.8830298368 यावरुन माझे मो.क्र. 9130480003 यावर व्हॉट्सअॅप कॉल आला असता, त्यांनी फोनचा स्पीकर ऑन केला आणि माझेत व लोकसेवक श्री. जाधवर यांचेत पंचासमक्ष बोलणे झाले. सदरचा फोन कॉल व्हाईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे.

सदर व्हॉट्सअँप कॉलवरील संभाषणादरम्यान, लोकसेवक श्री. जाधवर, मला" हॅलो उदया, उदया आपलं कामं किती वाजेपर्यंत होईल" असे बोलले त्यावर मी, लोकसेवक श्री. जाधवर यांना "अं... पेमेंटच" असे बोललो, त्यावर लोकसेवक श्री. जाधवर, मला"हां..." असे बोलले त्यावर मी लोकसेवक श्री. जाधवर यांना "माझी तेवढी रिक्वेस्ट ही करा की, पेमेंटची थोडी" असे बोललो. त्यावर लोकसेवक श्री.जाधवर मला"काय सांगा की" असे बोलले.त्यावर मी लोकसेवक श्री. जाधवर यांना "तुम्हीच, तुम्हीच सांगा व्यवस्थित इन्स्टीटयुटमध्ये एवढी नाय फी घेत सर आम्ही पोरांची" असे बोललो. त्यावर लोकसेवक श्री. जाधवर मला यांना "ठीकय ठीकय, चाळीस करुन टाका जाऊ दया" असे बोलले. त्यावर मी लोकसेवक श्री. जाधवर यांना"चाळीस हजार का.... चालतय" असे बोललो त्यावर लोकसेवक श्री.जाधवर मला"आं..." असे बोलले.त्यावर मी लोकसेवक श्री. जाधवर यांना "चाळीस हजार करुन

टाकतो"असे बोललो. त्यावर लोकसेवक श्री. जाधवर मला"हो हो उदया अकरा वाजेपर्यंत करा मात्र"असे बोलले. त्यावर, मी लोकसेवक श्री. जाधवर यांना "शंभर टक्के अकरा... कॅश कॅश काढतो अकरा वाजेपर्यंत मी" असे बोललो. त्यावर लोकसेवक श्री. जाधवर मला"हअं... काही अडचण येवु देत नाही, मी सगळं केलेलच आहे, मी सांगितलय सरांना, तुम्ही आता बोलायची पण काय गरज नाय त्यांना" असे बोलले. त्यावर मी लोकसेवक श्री. जाधवर यांना "बरं बरं चालतयं" असे बोललो.त्यावर लोकसेवक श्री. जाधवर मला "नाय नाय, काय अडचण, आम्ही आम्हीसुद्धा तुम्हाला काय अडचण येऊ देत नाय उदया एक अकरा वाजेपर्यंत आपलं करुन टाका जाऊदया आं..." असे बोलले. त्यावर मी, लोकसेवक श्री.जाधवर यांना "चालतय चालतय चालतय ठीकय" असे बोललो.

एकंदरीत वरील माझे व लोकसेवक श्री.जाधवर, प्राचार्य शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, माळेगावं बु. यांचेतील फोनवर झालेल्या वरील संभाषणानुसार लोकसेवक श्री. जाधवर, प्राचार्य शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, माळेगाव बु., बारामती यांनी माझे रेणुका पॅरामेडीकल इन्स्टीटयुट, बारामती येथे वार्षिक प्रमाणपत्र परीक्षा जुन 2025 करीता पर्यवेक्षक नेमण्याकरता तसेच परीक्षा सुरळीत पार पाडण्याकरीता, परीक्षेमध्ये काहीएक अडचण न आणण्याकरीता सुरुवातीस 80,000/- रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती 40,000/- रुपये लाच मागणी करुन सदरची 40,000/- रुपये लाच रक्कम उदया दि.24/06/2025 रोजी सकाळी 11:00 वा. पर्यंत देणेबाबत लोकसेवक श्री.जाधवर यांनी सांगितलेचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे पुढील सापळा कारवाई दि. 24/06/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्याप्रमाणे आज दि.24/06/2025 रोजी सकाळी 09:06 वा. सापळा पथक, पोनि भोसले व दोन्ही पंच मेडद येथील शरयु टोयोटा शोरुम चे जवळ आले असता, सदर ठिकाणावरुन पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. जाधवर यांनी मागणी केलेली लाच रक्कम कोठे दयायची याकरीता मी लोकसेवक श्री.जाधवर यांना फोन केला असता त्यांनी 11:30 वा. सुमारास हॉटेल सिटी इन बारामती येथे येण्यास सांगितले. त्यानंतर पोनि भोसले यांनी दोन पंचासमक्ष मला लोकसेवक श्री. जाधवर, प्राचार्य शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, माळेगाव बु., बारामती यांनी लाचमागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्याकरीता लाच रक्कम हजर करण्यास सांगितले, त्यावेळी मी माझ्या बचतीमधील रु.40,000/- रुपये पोनि अमोल भोसले यांचे समक्ष हजर केले. त्यानुसार पोनि भोसले यांनी दोन्ही पंच व मला अँथ्रासीन पावडर व अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले व मी हजर केलेल्या 500/- रु. दराच्या भारतीय चलनातील 80 ख-या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्या नोटांना पोशि महामुलकर यांनी अँन्थ्रॉसिन पावडर लाऊन सदर नोटा माझे जिन्स पॅन्टचे पुढील बाजुच्या उजव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर पोशि महामुलकर यांनी त्यांचे हात पाण्याने स्वच्छ धुवुन घेतले. मनुष्यबळाअभावी पोशि महामुलकर यांना सापळा पथकात सामील करण्यात आले. सदरची लाचरक्कम लोकसेवक श्री. जाधवर यांना देणेकरीता पोनि भोसले यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, माझे शर्टचे आतील बाजुस बनियनला कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने सेफ्टी पिनचे मदतीने लावुन पंच नं 1 यांचेसोबत हॉटेल सिटी इन येथे सकाळी 11:34 वा. सुमारास रवाना केले व आमचे पाठोपाठ पोनि भोसले व उर्वरीत सापळा पथक हॉटेल सिटी इन कडे रवाना झाले. मी व पंच क्र.1 असे माझेकडील मारुती ओमिनी गाडी क्र. एम एच 42 ए एस 8433 ने हॉटेल सिटी इनयेथे गेलो, त्यावेळीमी, पंच क्र.1 सागर जमदाडे आणि लोकसेवक श्री. जाधवर हॉटेल सिटी इनच्या रेस्टॉरंट एरियामध्ये बसलो असताना, श्री. जाधवर यांनी मला हाताने त्यांचेसोबत येणेबाबत खुणवले असता, पंच क्र.1 सागर जमदाडे हेदेखील माझे सोबत उठु लागले त्यावेळी लोकसेवक जाधवर यांनी इशा-याने खाली बसण्यास सांगितले. यावर मी पंच क्र.1 यांना "सागर आलो मी" असे बोलुन लोकसेवक जाधवर यांचेसोबत लॉबीमध्ये गेलो असताजाधवर मला "इथच करा" असे म्हणाले, यावर मी लोकसेवक जाधवर यांना"इथं"असे म्हणालो, त्यावर लोकसेवक जाधवर मला "हअं..." असे म्हणाले, त्यावेळी मी माझे उजव्या हाताने, मी परिधान केलेल्या पॅन्टचे पुढील बाजुच्या उजव्या खिशातील रुपये 40,000/- लाच रक्कम काढुन डाव्या हातामध्ये घेवुन लोकसेवक श्री. जाधवर यांचेसमोर धरुन लोकसेवक श्री.जाधवर यांना "हं चाळीस येत मोजुन घ्या" असे म्हणालो, त्यावर लोकसेवक श्री. जाधवर यांनीलाच रक्कम त्यांचे डाव्या हाताने स्वीकारुन, त्यांनी परिधान केलेल्या खाकी रंगाच्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशामध्ये ठेवली आणि मला म्हणाले "नाय तस नसतं", त्यावर मी पुन्हा लोकसेवक श्री. जाधवर यांना "चाळीस हजारयेत, कमी जास्त"असे म्हणालो त्यावर लोकसेवक श्री. जाधवर मला"तुम्ही मला अजुन ओळखलं नाही, मी मोजणा-यांपैकी नाही आलं लक्षात, तुमच्यावर विश्वास आहे हे लक्षात ठेवा, विश्वास नसता तर वेगळी गोष्ट असती"असे म्हणाले.त्यानंतर मी हॉटेल सिटी इनच्या बाहेर येवुन परिधान केलेल्या शर्टाचे दोन्ही हाताच्या बाहया कोपरापर्यंत दुमडुन लाच रक्कम स्वीकारलेबाबात पुर्वनियोजित इशारा पोनि भोसले व सापळा पथकास केला. त्यावेळी पोनि भोसले यांनी लोकसेवक श्री. जाधवर यांना त्यांची ओळख सांगुन ताब्यात घेतले.त्यावेळी पोनि भोसले यांनी लोकसेवक श्री.जाधवर यांना लाच रक्कम काढुन देण्यास

सांगितले असता, लोकसेवक श्री. जाधवर यांनी त्यांनी परिधान केलेल्या खाकी रंगाच्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डावे खिशातील लाच रक्कम काढुन दिली. त्यावेळी पोनि भोसले यांनी पंच क्र.1 जमदाडे यांना सदर रक्कम ताब्यात घेण्यास सांगुन ताब्यात घेतलेल्या नोटांवरील क्रमांक व सापळापुर्व कारवाई दरम्यान पंच क्र.2 श्री. शेळके यांचे ताब्यात नोटक्रमांक लिहून दिलेला कागद यावरिल नोटांचे क्रमांक हे एकच आहेत का?याबावत खात्री करण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच क्र.2 शेळके यांनी त्यांचेकडील कागदावर लिहलेल्या क्रमांकाशी पडताळून पाहिले असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर पोनि भोसले यांनी हॉटेल सिटी इन येथील लॉबीमधील लाईट्स बंद करुन अंधार केला. सदर अंधारामध्ये लोकसेवक श्री. जाधवर यांचे हात व हस्तगत केलेली रक्कम अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासले असता लोकसेवक श्री. जाधवर यांचे डाव्या हाताचा तळ हात, बोटांचे पे-यांवर तसेच त्यांनी परिधान केलेल्या पॅन्टचे पुढील बाजुचे डाव्या बाजुचे खिशाचे आतील व बाहेरील बाजुस, लाच रक्कम यावर अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली तसेच पंच क्र.1 श्री. जमदाडे यांचे हाताचे बोटांवर व तळहातास अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर पोनि भोसले यांनी पंचासमक्ष माझे दोन्ही हात, पॅन्टचे पुढील बाजुचा उजवा खिसा तसेच शर्टचे पुढील खालील बाजुस यावर अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्यावर निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दिनांक 23/06/2025 रोजी 17:59 वा. तेदि.24/06/2025 रोजीचे 13/10 वा. चे दरम्यान हॉटेल सिटी इन बारामती, ता. बारामती, जि.पुणे येथे श्री.अवधुत धिमाजी जाधवर, वय 53 वर्षे, व्यवसाय - शासकीय नोकरी पद- उपप्राचार्य, अतिरीक्त कार्यभार प्राचार्य शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, माळेगाव बु., बारामती (वर्ग-1), ता. बारामती, जि.पुणे रा. भगवंत बिल्डींग, त्रिमुर्ती बाग, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, मांजरी च्या पाठीमागे, मांजरी, पुणे यांनी, माझे रेणुका पॅरामेडीकल इन्स्टीटयुट, बारामती येथे वार्षिक प्रमाणपत्र परीक्षा जुन 2025 करीता पर्यवेक्षक नेमण्याकरता तसेच परीक्षा सुरळीत पार पाडण्याकरीता, परीक्षेमध्ये काहीएक अडचण न आणण्याकरीता सुरुवातीस 80,000/- रुपये लाच मागणी करुन तडजोडी अंती 40,000/- रुपये लाच मागणी करुन सदरची 40,000/- रुपये लाचरक्कम हॉटेल सिटी इन बारामती येथील लॉबीमध्ये स्वीकारली म्हणुन माझी त्यांचेविरुदध फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

vaishali raosaheb patil(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
बारामती तालुका पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): vaishali raosaheb pa
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):